भारतातील पारंपरिक कला आणि ती जपणारे कारागीर यांचा विकास करून शाश्वत भविष्य घडवणे

**11** डिसेंबर **2023:** एंटरप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (**EDII),** अहमदाबाद यांनी प्रोजेक्ट हँडमेड इन इंडिया (**HMI)** अंतर्गत वर्ल्ड ट्रेड सेंटर**,** कुलाबा मुंबई येथे **8** आणि **9** डिसेंबर **2023** रोजी थॉट लीडरशिप सेमिनार आणि थीमॅटिक फॅशन शोचे आयोजन केले होते. याला **HSBC** चे आर्थिक सहकार्य लाभले. एंटरप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (**EDII),** अहमदाबाद हे हँडमेड इन इंडिया प्रकल्पाचे अंमलबजावणी भागीदार आहे. आसाममधील कामरूप**,** ओरिसातील बरगढ**,** गुजरातमधील भुज आणि सुरेंद्रनगर**,** मध्य प्रदेशातील महेश्वर आणि तामिळनाडूमधील सेलम या सहा क्लस्टर्सना हँडमेड इन इंडिया प्रकल्पाअंतर्गत मदत केली जात आहे.

प्रदर्शनात एचएमआय प्रकल्पांतर्गत समाविष्ट असलेल्या सहा क्लस्टरमधील उत्पादने आहेत. EDII प्रशिक्षित कारागीर आणि कामगार यात सहभागी झाले असून एकूण 25 स्टॉल्स आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे, श्री रोमित सेन, वरिष्ठ उपाध्यक्ष, कॉर्पोरेट सस्टेनेबिलिटी, HSBC इंडिया आणि सन्माननीय अतिथी, श्री सत्य प्रसाद वर्मा, अतिरिक्त वस्त्रोद्योग आयुक्त आणि वस्त्रोद्योग समिती, मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते झाले. यांच्यासह डॉ. सुनील शुक्ला, महासंचालक, ईडीआयआय; डॉ. रमण गुजराल, संचालक, प्रकल्प विभाग (कॉर्पोरेट), EDII आणि इतर वरिष्ठ अधिकारी सरकारी मंत्रालये/विभाग आणि कॉर्पोरेट नेते आणि प्रसिद्ध संस्थांमधील उद्योजक देखील यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात एका थीमॅटिक फॅशन शोने झाली ज्यात 'क्राफ्टिंग अ सस्टेनेबल फ्यूचर: हँडमेड इन इंडिया' आणि 'प्रेरणादायी वारसा, सक्षम, सशक्त भविष्य: आधुनिक भारतातील हातमाग' या थीमखाली शाश्वततेवर भर देण्यात आला. प्रत्येक समुहाने काळापलीकडील कलेचे महत्त्व सांगितले आणि शाश्वतता आणि सक्षमीकरणाचा संदेश देत समृद्ध सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या भारताचा गौरव केला. यावेळी डिझायनर्सनी मॉडेल्ससाठी कपडे तयार करण्यासाठी प्रकल्प HMI अंतर्गत EDII प्रशिक्षित कारागिरांनी विकसित केलेल्या फॅब्रिकचा वापर केला.

फॅशन शोनंतर थॉट लीडरशिप वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते ज्यात धोरणकर्ते, उद्योग व्यावसायिक, व्यवसायी, विणकर आणि कारागीर यासह भागधारकांनी सहभाग घेतला होता. पॅनल चर्चेच्या विषयांमध्ये 'प्रेरणादायी वारसा, सक्षम, सशक्त भविष्य: हँडलूम्स इन मॉडर्न इंडिया' आणि 'क्राफ्टिंग अ सस्टेनेबल फ्युचर: हँडमेड इन इंडिया' यांचा समावेश होता. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या विशिष्ट हस्तकला पुनरुज्जीवित करण्याचे EDII मॉडेल विस्तृतपणे सामायिक केले गेले. विविध राज्यांमधील विविध हस्तकलेसाठी मॉडेलच्या प्रतिकृतीचे मूल्यांकन केले गेले तसेच सर्वोत्तम पद्धतींचे पुनरावलोकन केले गेले.

आपल्या भाषणात प्रमुख पाहुणे आणि HSBC इंडियाचे सीनियर उपाध्यक्ष, कॉर्पोरेट सस्टेनेबिलिटी श्री रोमित सेन म्हणाले, "HSBC च्या HMI प्रकल्पाने कारागिरांना त्यांच्यासाठी शाश्वत उपजीविकेचे पर्याय सुनिश्चित करून कौशल्य आणि सक्षम बनविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आज हे प्रशिक्षित कारागीर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहेत आणि सर्जनशीलपणे विचार करण्यासाठी आणि वाढीसाठी विजयी व्यवसाय धोरणे अंमलात आणण्यासाठी ते अधिक चांगल्या ठिकाणी आहेत. ते भारताच्या कला आणि हस्तकलेचे संरक्षक आहेत.

श्री सत्य प्रसाद वर्मा, अतिरिक्त वस्त्रोद्योग आयुक्त आणि वस्त्रोद्योग समिती, मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले, "आपल्या देशाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक विकासात वस्त्रोद्योग क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. एकत्रित प्रयत्न आणि धोरणात्मक उपक्रमांद्वारे, आम्ही या क्षेत्रातील मूर्त प्रगती पाहत आहोत. विविध क्लस्टर्समधील उत्पादनांचे प्रदर्शन हे सहयोगी प्रयत्नांच्या यशाचा दाखला आहे. अशा उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे."

डॉ. सुनील शुक्ला, महासंचालक, ईडीआयआय त्यांच्या सुरुवातीच्या भाषणात म्हणाले की, "शाश्वत भविष्याच्या शोधात, ईडीआयआय प्रकल्प HMI अंतर्गत आपल्या विविध उपक्रमांद्वारे कारागिरांच्या जीवनात प्रगती आणि विकास घडवून आणण्यासाठी वचनबद्ध आहे. कारागिरांचे पालनपोषण आणि सक्षमीकरण आणि देशातील विणकरांची नितांत गरज आहे कारण भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्याचा हा एकमेव मार्ग आहे."

"या कार्यक्रमाच्या यशाने आपण आनंदी झाल्याचे श्री. रमण गुजराल सांगतात. फॅशन शो आणि प्रदर्शन आमच्या हस्तकलेची आणि शिल्पकारांची क्षमता दर्शवतात. आपण त्यांचे हे कौशल्य जपले पाहिजे. आणि व्यावसायिक म्हणून त्यांची योग्य वाढ होणे, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे."

X-X-X